
चिंतन

# सहकाराशिवाय समाजाचा उद्धार नाही!



डॉ. बी.बी. पवार
(संस्थापक संपादक: 'पूर्वा कृषिदूत')

- 'नेकी' बाळगून वापरलेली सामूहिक शक्ती हीच समाजाच्या सर्वंकष प्रगतीची युक्ती...
- 'तुकडेमोड' जमिनीमुळे झालेली हानी 'एकी'ची आकडेमोड करून निघेल भरून...
- पिकवणारा विकायला शिकेल तेव्हाच नफा दिसेल; हुकुमाचा पत्ता त्याच्या हातात असेल...
- यासाठी संघटन हवं, पिकाचं मोल वावरात ठरून बाजारात रोखीत मिळायला हवं...
- 'गाव करी ते राव न करी' ही प्रसिद्ध म्हण हाच गुरुमंत्र सांगते...
- शिवार ते बाजार या व्यापाराच्या साखळीत आता शेतकऱ्यांनीच एकमेकांना लावावा हातभार...

समाजात अशा अनेक गोष्टी आहेत की त्या एकट्या दुकट्या व्यक्तीला साध्य करता येत नाहीत. आजकाल तर इतरांच्या सहकार्याची विशेष गरज भासते. भारत हा कृषिप्रधान देश. वर्षानुवर्षे कुटुंबातील शेतीचे तुकडे होत गेले. हे तुकडे गावातील विविध शिवारांत विखुरले गेले. पिढीगणिक विभक्त होत जाणाऱ्या कुटुंबांच्या, केवळ तुकड्यांच्या रूपात उरलेल्या अशा शेतजमिनींमुळे भारतात ८०% पेक्षा अधिक शेतकरी अल्पभूधारक बनले आहेत. ही संख्या यानंतर वाढतच जाणार आहे. अल्प धारणेची तसेच विखुरलेली शेती कसताना शेतकऱ्यांना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे. शेती योग्य पद्धतीने करण्यासाठी शेतकऱ्याकडे बैलजोडी, औजारे व एक तरी देशी गाय यांची नितांत आवश्यकता असते. बैलजोडी व औजारे नसतील तर शेतकरी परावलंबी बनतो. परावलंबी शेतकऱ्याला शेतीचं कोणतंही काम वेळेवर करता येत नाही. शेतीमधील प्रत्येक काम महत्त्वाचं असतं. नांगरट ही पीक काढल्यानंतर लवकरात लवकर करावी लागते. त्यामुळे नांगरट सोपी होते आणि काडीकचरा गाडला जाऊन जमिनीतील कर्बामध्ये वाढ होते. पेरणी ही सर्वात महत्त्वाची असते. शेतकरी असे म्हणतात की, घरात कोणी मेलं तर प्रेत झाकून ठेवावं व आधी वापश्यावर पेरणी पूर्ण करावी. कोळपणीलाही असेच महत्त्व आहे. त्यामुळे तणांचा बंदोबस्त चांगला होतो व पिकाच्या मुळांना हवा मिळते. अशा प्रकारे शेतीच्या प्रत्येक कामाची वेळ महत्त्वाची असते. अल्पभूधारकांना मात्र दुर्दैवानं कोणतीच कामं वेळेवर करता येत नाहीत.

## सहकाराचा मंत्रच शेतीला तारेल

पीकवाढीच्या काही ठराविक अवस्था अतिशय संवेदनशील असतात. त्यावेळी पिकाला

पाण्याची गरज असते. अलीकडे पाऊस अतिशय बेभरवशाचा झाला आहे. त्यामुळे पिकांची पाण्याची गरज भागवण्यासाठी हक्काचे पाणी असायला हवे. त्यासाठी विहीर असावी किंवा शेततलाव असावा. शेततलाव बांधण्यासाठी जागा अडवणे हे शेतकऱ्यांना परवडणारे नसते. त्यावर गटशेती हा उत्तम उपाय आहे. जवळपासच्या सर्व लहानमोठ्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गटाची स्थापना केली पाहिजे. त्यामुळे सर्वांना सोयीचे ठरेल अशा ठिकाणी शेततलाव बांधता येतो. विजेची जोडणी घेता येते. सर्वांच्या सहकार्याने शेतीची कामं करता येतात. शेतमालाची विक्री किंवा निर्यातही करता येते. असे काही गट एकत्र येऊन शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना करता येते. या हेतूने स्थापन झालेली, नाशिक जिल्ह्यातील श्री. विलास शिंदे यांची 'सह्याद्री' ही शेतकरी उत्पादक कंपनी आता आदर्श ठरली आहे. तिचा अभ्यास करून शेतकरी बांधवांनी तिचे अवश्य अनुकरण करावे. अशा कंपनीच्या माध्यमातून विविध प्रक्रिया उद्योग सुरू करता येतात. शेतकऱ्यांचा माल जमा करून त्याची विक्री व्यवस्था सोपी करता येते. मालाची निर्यात करता येते. तसंच जास्त माल उपलब्ध असल्यामुळे देशांतर्गत बाजारपेठांमध्ये पाठवणंही सोपं होतं. शेतमालाची मूल्यवाढही साध्य करता येते. त्या बरोबरच कुक्कुटपालन, शेळीपालन, गोपालन, मधमाशीपालन असे जोडधंदेही करता येतात.

## कृषिक्षेत्रातील सहकाराची मुहूर्तमेढ

श्री. लल्लूभाई सामळदास यांनी सन १९१८ मध्ये बारामती येथे दि नीरा व्हॅली सहकारी साखर कारखाना सुरू केला. ब्रिटिश कंपनीने सन १९१९ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील हरेगाव येथे पहिला साखर कारखाना काढला. सन १९४१ पर्यंत राज्यात १२ साखर कारखाने कार्य करू लागले. अहमदनगर जिल्ह्यातील लोणी येथे विठ्ठलराव विखे पाटील यांचा जन्म इ.स. १८९७ मध्ये झाला. त्यांचं शिक्षण फक्त चौथीपर्यंत झालं होतं; मात्र दूरदृष्टी असामान्य होती. डॉ. धनंजय गाडगीळ यांच्या मदतीने त्यांनी ३१ डिसेंबर १९५० रोजी प्रवरानगर येथे आशिया खंडातील शेतकऱ्यांचा पहिला प्रवरा सहकारी साखर कारखाना सुरू केला. त्यांनी केवळ राज्यातीलच नव्हे तर साऱ्या देशातील शेतकऱ्यांना नवी दिशा दिली. ही सुरुवात औद्योगिक क्रांतीचा पायाच ठरली. पुढे त्यांना पद्मश्री पुरस्कार मिळाला. डी.लिट. ही पदवीही बहाल करण्यात आली. ते सहकारमहर्षी ठरले. राज्यातील सहकारी चळवळीचे ते प्रणेते होते. त्या नंतर राज्यात अनेक सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, सहकारी बँका व सहकारी सोसायट्या यांची स्थापना झाली. या प्रगतीमागे पद्मश्री विखे पाटील यांची कृतिशील प्रेरणाच होती. सन १९५० मध्ये सुरू झालेला हा कारखाना ७० वर्षांनंतरही अतिशय कार्यक्षमपणे चालू आहे. त्यांचा आदर्श समोर ठेवून भाऊसाहेब हिरे, काकासाहेब वाघ यांच्यासारख्या दूरदर्शी व प्रामाणिक नेत्यांनी राज्यात अनेक सहकारी साखर कारखान्यांची स्थापना केली. नाशिक जिल्ह्यात निफाड, रानवड, दाभाडी, नाशिक, कादवा, विठेवाडी या सहकारी साखर कारखान्यांची स्थापना झाली. ठेंगोडा येथे सूतगिरणी सुरू झाली. अहमदनगर जिल्ह्यात कोपरगाव, कोळपेवाडी, राहुरी या ठिकाणी प्रभावी पुढाऱ्यांनी सहकारी साखर कारखाने सुरू केले. पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ येथेही सहकारी साखर कारखाने सुरू झाले. खान्देशातील साक्री, शिरपूर व शहादा येथील कारखाने नावारुपाला आले. दत्त, वारणा यासारखे कारखाने नावलौकिकाला पोहोचले. सन २००१ पर्यंत २०१ पर्यंत साखर कारखाने सुरू होते. नाशिक जिल्ह्यात रावळगाव साखर कारखाना व द्वारकाधीश साखर कारखाना

हे खासगी कारखाने सुरू झाले. या कारखान्यांमुळे व सूतगिरण्यांमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक स्थितीमध्ये प्रचंड क्रांती झाली. अनेक लोकांना रोजगार मिळाला. ग्रामीण रस्ते सुधारले. चांगल्या शाळा व महाविद्यालये सुरू झाली. मुलांसाठी वसतिगृहे सुरू झाली. कारखान्यांच्या विकासाबरोबर शेतकऱ्यांना चांगला पैसा मिळू लागला.

## पुढारी मोठे आणि शेतकरी कर्जबाजारी!

सुरवातीला काही काळ सर्वच सहकारी साखर कारखाने नफ्यात चालू होते. पुढे काळाच्या ओघात चेअरमन व संचालक मंडळ बदलत गेले. ज्या कारखान्यांचा कारभार प्रामाणिक आणि कल्याणकारी चेअरमनकडे गेला त्या कारखान्यांची आजही प्रगती होताना दिसते. ज्या कारखान्यांना भ्रष्ट कारभारी मिळाले ते कारखाने तोट्यात गेले. असे कारखाने पुढे कधीच पूर्वपदावर आले नाहीत. दाभाडी, निफाड, साक्री, नाशिक, विठेवाडी हे कारखाने अतिशय प्रगतिपथावर होते. भ्रष्ट पुढाऱ्यांमुळे हे कारखाने तोट्यात गेले आणि कर्जबाजारी झाले. ठेंगोडा येथील व राहुरी येथील सूतगिरण्या बंद पडल्या. शेतकऱ्यांना ऊसाचे व कापसाचे पैसे मिळाले नाहीत. पुढारी मात्र कोणी आमदार झाले, कुणी खासदार तर कुणी मंत्री झाले. शेतकरी मात्र कर्जबाजारी झाले. काहींनी आत्महत्या केल्या तर काही हाय खाऊन वैकुंठवासी झाले. काही कारखाने तांत्रिक कारणांमुळे बंद पडले.

## आता केंद्र शासनाचे सहकार खाते...

भारतीय राज्य घटनेत केंद्र आणि राज्ये यात खात्यांचं वाटप केलेलं आहे. त्यानुसार सहकार खाते केंद्रात नाही. राज्यांमध्ये ते होते. पण ते अलीकडेच केंद्रात सुरू केले आहे. प्रथमच त्याची जबाबदारी गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पुढाऱ्यांना धडकी भरली आहे. नेत्यांमध्ये उलटसुलट प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. काही म्हणतात की राज्यात त्याचा काहीच फरक पडणार नाही. तर काहींच्या मते खूप फरक पडणार आहे. राज्यातील सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, बँका, सोसायट्या इत्यादींमध्ये प्रचंड भ्रष्टाचार माजलेला जनतेला दिसत आहे.

सहकार म्हणजे जनतेने जमा केलेले पैसे. त्यासाठी कोणी दागिने विकले, कोणी शेत, कोणी घर गहाण ठेवले. कोणी मिळेल तेथून कर्ज काढले. अशा रीतीने जमा केलेले पैसे प्रवर्तकांकडे सोपवले. प्रवर्तकांनी साखर कारखाने, सूतगिरण्या पतसंस्था काढल्या. शेतकऱ्यांचा त्यात शेअर असल्यामुळे ते अतिशय खूष झाले. सुरवात छान झाली. पण पुढे सहकाराचा पूर्ण स्वाहाकार झाला. पुढाऱ्यांनी मिळालेल्या उत्पन्नातून रोखीचा पैसा खाल्ला. संस्था चालवण्यासाठी कर्ज घेतले. तेही अर्धेअधिक हजम केले. संस्था डबघाईला आणली. आपण तोट्यात आहोत असे म्हणून हात वर केले. ऊसाचे व कापसाचे पैसे शेतकऱ्यांना मिळाले नाहीत. शेतकरी हवालदिल झाले, कंगाल झाले. दूध फेडरेशन व जिल्हा बँकांचीही हीच स्थिती. पुढारी आमदार, खासदार व मंत्री झालेत. शेतकरी कर्जबाजारी झालेत. कारखाने, सूतगिरण्या, बँका बुडाल्या पण चेअरमन मोठे झाले. आजारी संस्था स्वस्तात विकून पुढाऱ्यांनीच खरेदी केल्या. सहकारात त्या तोट्यात होत्या, पण स्वत:च्या मालकीच्या झाल्यावर नफ्यात आल्या! पतपेढ्यांमध्ये प्रामाणिक लोकांनी पैसे ठेवले आणि धूर्त लोकांनी कर्ज उचलले त्याचा प्रामाणिकपणे उपयोग व्हावा, असे वाटते.